# शिक्षणाचा उपयोग मन कणखर व चारित्र्यसंपन्न बनविण्यासाठी करा

- मुंबई विदयापीठाचे कुलगुरू डॉ. संजय देशमुख यांचे प्रतिपादन
- लक्ष्मीबाई महाविदयालयाचा वर्धापनदिन उत्साहात

▶दोडामार्ग (प्रतिनिधी)

शिक्षणाकडे केवळ अर्थाजन म्हणून न पाहता मन कणखर व चारित्र्य, संपन्न बनविण्यासाठी तसे प्रयत्न करा. तशी वाटचाल केल्यास भविष्यातील जीवन हे सुखमय होणार असून स्वतःच्या पायावर उभे राहिल्याचा आनंद मिळेल असे प्रतिपादन मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय देशमुख यांनी केले.

दोडामार्ग येथील लक्ष्मीबाई सिताराम हळबे महाविदयालयाच्या वर्धापन दिन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी त्यांच्यासमवेत व्यासपीठावर संस्थाअध्यक्ष अभिजीत हेगशेटये, प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील, संस्था पदाधिकारी विवेकानंद नाईक, सुचन कोरगावकर ,भाई परमेकर, बाबुराव धुरी, मोहन खातू यांच्यासह संजीव कर्पे, योगेश प्रभु आदी उपस्थित होते.



कार्यक्रमात बोलताना मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय देशमुख सोबत अन्य. (छाया- तेजस देसाई)

यावेळी डॉ. देशमुख म्हणाले, आई वडील आपण निवडू शकत नाही पण पुढे कोण व्हायचे हे स्वतःच ठरवावे लागेल. कष्ट केल्याशिवाय काहीही मिळत नाही. त्यासाठी जिद्दीने प्रयत्न करा.

यावेळी डॉ. देशमुख यांच्या हस्ते महाविद्यालयाचे हिंदी विषय शिक्षक प्रा. ढेपे यांच्या स्वरचित प्रादेशिक भाषेतील कवितासंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. तसेच विषयांतर्गत प्रकाशित होणारी इन हाऊस बुलेटीन यांचेही प्रकाशन केले.

यावेळी डॉ. देशमुख यांनी प्रा. ढेपे यांच्या कवितासंग्रहाचे कौतुक करीत स्वतःही स्वरचित कविता सादर केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. जाधव यांनी केले.